**क्रमांक- १२९**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग - दोन**

**<u>बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०२६/ श्रावण २८, शके १९४८</u>**

१२९. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, भंडारा जिल्ह्यात दिनांक २२ जुलै, २५ जुलै व २६ जुलै, २०२६ या तीन दिवसांपैकी एका दिवशी शासनाद्वारे महसूल विभागामार्फत "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आली होती व त्यानुषंगाने भंडारा जिल्ह्यात हेमंत सेलिब्रेशन हॉल, रॉयल पब्लिक शाळेजवळ दिनांक २ ऑगस्ट, २०२६ रोजी उक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी भंडारा विधानसभा क्षेत्रातील श्री.सावन कुमार, जिल्हाधिकारी व श्रीमती माधुरी तिखे, उप विभागीय अधिकारी यांचेवर होती. शासनाने दिनांक ९ जुलै, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन स्थानिक स्तरावर कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासंदर्भात निदेश दिले असून सन्माननीय सदस्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून उक्त कार्यक्रमाचे अध्यक्षपद देणे अपेक्षित होते. मात्र श्री.सावन कुमार, जिल्हाधिकारी व श्रीमती माधुरी तिखे, उप विभागीय अधिकारी यांच्यामार्फत सदर कार्यक्रमाच्या बॅनरवर तसेच उक्त कार्यक्रमाच्या कार्यालयीन माहिती पुस्तिकेमध्ये सन्माननीय सदस्यांच्या ऐवजी अन्य जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचा फोटो दर्शविण्यात आल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. नरेंद्र भोंडेकर यांनी श्री.सावन कुमार, जिल्हाधिकारी, भंडारा व श्रीमती माधुरी तिखे, उप विभागीय अधिकारी यांचेविरुध्द दिनांक १८ ऑगस्ट, २०२६ रोजी दिलेली विशेषाधिकारभंग व अवमानाची सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम २८४ मधील तरतूदींच्या अधीनतेने स्वेच्छानिर्णयाने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट, २०२६ रोजी सुपूर्द केली आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १९ ऑगस्ट, २०२६**

**जितेंद्र भोळे**
**सचिव - १**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
४) संगणक कक्ष (वेबसाईट) व एम.के.सी.एल. कक्ष